महाराष्ट्र शासन

# प्रवेश नियामक प्राधिकरण

८वा मजला, न्यु. एक्सलसियर
बिल्डींग, ए.के. नायक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१

दूरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com

**महत्वाचे / कालमर्यादा / ईमेलद्वारे**

क्रमांक: संकीर्ण/प्र.क्र.१७०/प्रनिप्रा, /202

दिनांक : 11 OCT 2018

प्रति,
अधिष्ठाता/प्राचार्य,
सर्व खाजगी व विनाअनुदानित
व्यावसायिक अभ्यासक्रमाची महाविद्यालये,
महाराष्ट्र राज्य

**विषय : शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेची माहिती सादर करणे, प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रवेश पडताळणी व प्रवेश मान्यतेची प्रक्रिया....**

विषयांकित प्रकरणास अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रवेश मान्यतेच्या अनुषंगाने संबंधीत सर्व महाविद्यालयांना खालील प्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

१) सर्व खाजगी विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमातील महाविद्यालयांच्या Login मध्ये उपलब्ध केलेल्या माहिती व्यतिरिक्त, प्रवेशित विद्यार्थ्यांना महाविद्यालयाने अदा केलेले ओळखपत्र अपलोड करणे बंधनकारक राहील, तसेच चूकीची माहिती सादर करणे अथवा मान्य केल्यास संबंधीत महाविद्यालयांवर शिस्तभंगाची तसेच दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

२) महाविद्यालयांना माहिती व प्रक्रिया शुल्क सादर करण्याबाबत खालील प्रमाणे वेळापत्रक ठरविण्यात आले आहे,-

1. Last date for registration : 30/09/2018 extended 14/10/2018
2. Last date for submission / confirmation of admission details : 30/11/2018
3. Last date for submission of "Processing Fees :
   - i) Without Penalty : 30/11/2018
   - ii) Penalty of 20% : 1/12/2018 to 31/12/2018
   - iii) Penalty of 40% :- 1/01/2019 to 15/01/2019
4. Last date for verification of admission details from concerned Directorate :-
   - i) Those who have submitted proposals without penalty : 15/12/2018
   - ii) Those who have submitted proposals with appropriate penalty : 25/01/2019

३) वरील वेळापत्रकानुसार महाविद्यालयांनी व संबंधीत ***संचालकांनी कार्यवाही करणे*** अनिवार्य राहिल, तद्नंतर महाविद्यालय अथवा संचालक यांच्याकडून **प्राप्त होणाऱ्या अहवालांचा विचार केला जाणार नाही, तसेच तद्नुषंगाने ज्या महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास मान्यतेअभावी भविष्यात उद्‌भवणाऱ्या अडचणींस संबंधीत महाविद्यालय/संस्था व संचालक जबाबदार राहील,** याची कृपया नोंद घ्यावी.

४) महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील तरतूदींच्या अनुषंगाने **दिनांक ३१ जानेवारी २०१९** नंतर येणाऱ्या प्रस्तवांचा विचार केला जाणार नाही, या संदर्भात सर्व संबंधीतांनी कृपया गांर्भीयाने दखल घ्यावी, ही विनंती.

(आ.ए. रायते) भा.प्र.से.
**सचिव,**
**प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई.**

प्रत माहितीकरिता अग्रेषित,-
१. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित,-
१. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई.
२. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई.
३. संचालक, आयुष संचालनालय, मुंबई.
४. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे
५. संचालक, कला शिक्षण संचालनालय, मुंबई.
६. संचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन, पुणे
७. कुलसचिव, पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपुर

प्रत,-
निवडनस्ती, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई.